आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय,

कुळगांव-बदलापूर

## अहवाल

## वाचन प्रेरणा दिन 2022

भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने आदर्श महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने 'पुस्तकावर बोलू काही' ही महाविद्यालय राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित केली होती. तसेच ग्रंथालयात आज दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांचे आणि इतर ग्रंथाचे प्रदर्शन भरविले.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त सुरुवातीला अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी वाङ्मय मंडळ,आय. क्यू. ए. सी आणि राष्ट्रीय सेवा योजनेने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले. यामध्ये विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळावी सवय व्हावी, यासाठी एका व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. आमच्या महाविद्यालयातील इतिहास विषयाचे विभाग प्रमुख प्रा. मंदार ठाकूर यांनी वाचनाचे महत्त्व फायदे यावर अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन आपल्या व्याख्यानातून केले वाचनामुळे जीवनाला उद्देश्य मिळतो ध्येय मिळते व सकारात्मक रित्या व्यक्ती व्यस्त होते, वाचनातून स्वयं अध्ययन होते. त्यासाठी आपण सर्वांनी नियमितपणे वाचन करण्याचा आज संकल्प करूया असे प्रेरणादायी आव्हान त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

माननीय प्र-प्राचार्य डॉ. संगीता पांडे यांनी आपल्या मनोगततातून विद्यार्थ्यांना वाचनाचे विविध फायदे काय होतात ते स्पष्ट केले. शब्दसंपदेत वाढ होणे, भाषेचा दर्जा सुधारणे, स्पर्धात्मक परीक्षांना तयारीसाठी वाचनाचे फायदे कसे होतात ते सांगितले. आजच्या डिजिटल आणि गॅजेटच्या युगात वाचन संस्कृती हरवत चालली आहे, परंतु त्याच गॅजेटचा वापर करून उदा., Kindle चा वापर करून पुस्तकेही आपण वाचू शकतो. याचा फायदा सर्व तरुणाईने घ्यायला हवा. मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप भेले यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. दक्षा हलकारे यांनी आभार प्रदर्शन केले. याशिवाय डॉ. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे एक प्रदर्शन देखील ग्रंथालयात भरवण्यात आले, ज्याला विद्यार्थ्यांनी भेट देऊन त्या पुस्तकांची माहिती घेतली.